महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

# Government Medical College & Hospital, Sindhudurg

Near Civil Hospital, A/P.Oras, Ta.-Kudal, Dist. Sindhudurg

Phone No.(02362 228355) Pin-416812 E-mail ldeangmchsindhudurg@gmail.com

---

जा.क्र.शावैमवरुसिं/दरपत्रक मागणी/ 2855 /२०२६ दिनांक :12/०८/२०२६

## संस्थेच्या संकेतस्थळावरुन दरपत्रके मागणी

**विषय**: शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, सिंधुदुर्ग या संस्थेतील आयकर कपाती करण्याबाबत..

**संदर्भ**:१. शावैमवरुसिं/दरपत्रक मागणी/१९१०/२०२६ दि. २३/०६/२०२६

२.शावैमसिं/खरेदी समिती बैठक/५२९५/२०२६ दि. १०/०८/२०२६

३. या कार्यालयाची मंजुर टिपणी दि. ११/०८/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र. १ अन्वये सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्याकरिता संस्थेच्या संकेतस्थळावरून दि. २४/०६/२०२६ ते ०७/०७/२०२६ या कालावधीत आठ दिवसांची मुदत देऊन दरपत्रके मागविण्यात आली होती परंतु दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे संस्थेच्या इमेल आयडी वरून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेकरिता दि. २९/०७/२०२६ रोजी दोन दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली होती. संदर्भ क्र. २ व ३ नुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तीनही पुरवठादारांनी न केल्यामुळे सदरची निविदा प्रक्रिया रद्द करून नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, सिंधुदुर्ग या संस्थेतील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांचे दरमहा वेतनातून आयकर कपात तसेच नियोक्ता २४Q मध्ये पगारातून कपात करण्यात आलेल्या आयकराचे (TDS) रिटर्न भरावयाचा असल्याने तातडीने करण्यासाठी आपणाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरहू दरपत्रके अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग व शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, सिंधुदुर्ग या संस्थेच्या नावे दोन लिफाफ्यातून दिनांक २४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावीत. विलंबाने सादर केलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

निविदा धारकाने दोन लिफाफा पध्दतीने निविदा भरण्याची आहे.

**१. तांत्रिक लिफाफा**:- या मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे, उदा. C.A प्रमाणपत्र, अनुभव, शासकीय संस्थेचा अनुभव, नजिकच्या शासकीय संस्थेमध्ये किमान ५०० ते ८०० कर्मचारी यांचे TDS चे काम पूर्ण केल्याचा अनुभव.

**२.कमर्शियल (व्यावसायिक) लिफाफा**:- दर

| आयकर कपात सेवा | | |
|---|---|---|
| 1 | Preparation Annual Salary Sheet of All Employees (12 Month's Salary Sheets) Preparation of Form No 16 part A and part B | |
| 2 | Preparation of E-TDS Return Quarterly 26Q-Non Salary and Form 16 A | |
| 3 | Preparation of GST TDS Return (GSTR-7) | |
| 4 | Preparation of E-TDS Revised Return 24 Q or 26 Q | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या आयकर कपाती दरपत्रक सादर करताना त्यावर अनुक्रमांक , नाव नमुद करण्यात यावे. तसेच या संस्थेस प्राप्त झालेले दरपत्रके खरेदी समिती समोर दिनांक २५/ ०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील. आपणांस दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास नियोजीत वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

न्युनतम ठरलेल्या सनदी लेखापाल यांच्या कडून दोन्ही संस्थांचे आयकर कपात बाबतचे सर्व कामे करुन घेण्यात येईल. शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय या संस्थेचे देयक वेगळे व शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग या संस्थेचे देयक वेगळे देण्याची अट राहिल.

Govt. Medical College and Hospital • Sindhudurg •

12-08-2026

डॉ. अनंत डवंगे,

(अधिष्ठाता)

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

**अधिष्ठाता**

**शासकीय वैदयकीय**

**महाविदयालय व रुग्णालय**

**सिंधुदुर्ग.**

अटी व शर्ती:

१.सदर दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात देण्यात यावेत. तसेच लिफाफ्यावर सामुग्रीचे नाव नमुद करण्यात यावे.

२. सदरील दरपत्रके अधिकृत लेटरहेडवर सादर करावे. त्यासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी क्लिअरन्स सर्टिफिकेट, जीएसटी नंबर किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅन कार्ड प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैध मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सेवा पुरवठा करण्यास कंपनीने प्राधिकृत व वैध प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग) इत्यादी माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

३. प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. तसेच वरील सर्व कामे ही एकाच फर्मच्या अखत्यारित संघर्ष नसल्याबाबत तसेच एकत्र निविदा देण्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४.दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाप्रमाणे असावेत. सदरच्या सेवेचे सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त सेवा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसात सेवा पुरवण्यात सुरवात करावी. सदरील सेवा सुरू करण्यात विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.

५.उपरोक्त नमुद सेवा हि उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.

६.सदर बाबीसाठी कोणत्याही सेवेचे शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रक वगळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

७.संबंधितांकडून सदरच्या सेवेचा मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करून देण्यात यावे.

८.दरपत्रकांवर नमुद सेवेचा हमी कालावधी नमुद करावा.

९.शासकीय नियमानुसार दुसरा व चौथा शनिवार व रविवार, तसेच जोडून आलेली सार्वजनिक रजा वगळून दरपत्रके सादर करण्यात यावीत, याची नोंद घ्यावी. दरपत्रके पोस्टाने पाठविण्यात आल्यास स्विकारल्या जाणार नाहीत.

१०. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग यांना आहे.

११. सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.

प्रत-

स्वीय सहाय्यक शाखा, श्री. विलास राठोड (उच्चश्रेणी लघुलेखक) यांनी सदरची जाहिरात संकेतस्थळावर दि.12/०८/२०२६ रोजी प्रसिध्द करावी.